# मराठी लोकसाहित्य

**श्री प्रवीण गणेशराव लोखंडे**

एम.ए. मराठी (भाषा विभाग)

ई-मेल- lokhandepravin38@gmail.com

---

**प्रस्तावना :**

वैभवशाली मराठी लोकसाहित्याला प्राचीन व समृद्ध अशी वैविध्यपूर्ण परंपरा लाभली आहे. या वैभवशाली लोकसाहित्याची मुळे प्राचीन वैदिक वाङ्मयात बघायला मिळते. मानवी जीवनात व्यक्तीच्या जन्मापासून ते अंत्यविधीपर्यंत जे प्रमुख धर्मविधी व महत्त्वाचे संस्कार आहेत, त्या प्रसंगी गायिली जाणारी आणि सर्वार्थाने अर्थपूर्ण अशी सुमधुर गाणी मराठी भाषेमध्ये आहे. प्रभावशाली मराठी लोकसाहित्यात प्रामुख्याने जन्म, विवाह, मुर्त्यू, विविध महत्वाचे सण, उत्सव, विशेष घटना, यासंबंधीचे अनेक गीते आहेत. या सर्वार्थाने अर्थपूर्ण गीतांमधून जीवनातील प्रखर वास्तविकता निदर्शनास येते. उदा.- मानवी जन्मासंबंधीचे गीते डोहाळेपासून ते अंगाई गीतांपर्यंतच्या अनेक अवस्थांतारांचे चित्रण हुबेहूब करतात. स्त्रीगीतांमध्ये स्त्री वेदनेचा हुंकार असलेली गीते विशेष लक्षणीय आहे. स्त्रीच्या वेदनेची कळ किती खोल आहे आणि तिचा व्यासंग किती मोठ्या प्रमाणात व्यापक आहे ह्याची कल्पना अशा गीतांमधून बघायला मिळते त्याचे जिवंत व मूर्तिमंत उदाहरण म्हणजे, गर्भार सितामातेचा त्याग करून त्यांना वनात सोडणाऱ्या प्रभूश्रीरामाबद्दल, साध्याभोळ्या ग्रामीण स्त्रीने आपल्या हृदयस्पर्शी भावना एका ओवीत व्यक्त केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे-

> राम म्हणून राम नाही सीताच्या तोलाचा |
> हिरकणी सीतामाई राम हलक्या दिलाचा ||

यासारख्या अनेक जिवंत आणि मूर्तिमंत उदाहरणातून हेच स्वाभाविकरीत्या सुस्पष्ट होते की, हे वैभवशाली लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा आविष्कार आहे. या आविष्काराला वैभवशाली पारंपारिक लोकजीवनाचे संदर्भ असतात. या उज्ज्वल आविष्कारातून लोकमानस प्रामुख्याने प्रकट होत असते.

लोकसाहित्याच्या विविध विचारवंतांच्या व्याख्या

**१) डॉ. प्रभाकर मांडे**

'लोकसाहित्य हे लोकांचे असते, 'लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य होय. संस्कृती ज्याप्रमाणे नेहमी परंपरागत असते, त्याप्रमाणे लोकसाहित्य हे परंपरागत असते आणि लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.'

**२) डॉ. ना. गो. नांदापूरकर**

'लोकवाड्मय म्हणजे, लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाड्मय तेच लोकवाड्मय होय.' लोकवाड्मयाचा कर्ता खऱ्या अर्थाने लोकच... लोकसमाजातील अज्ञात अशी व्यक्तीच, वास्तव लोकांनी तयार केलेले लोकभाषेतील लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेले जे लोकवाड्मय तेच लोकवाड्मय होय. लोकवाङ्मयाच्या या प्रकारात लोककथा, लोकगीते, कहाण्या, उखाणे इत्यादींचा समावेश होतो.'

**३) विल्यम बास्कम (William Bascom)**

'लोकसाहित्य म्हणजे दैवतकथा, आख्यायिका, लोककथा, म्हणी, कोडी आणि मौखिक माध्यमातून व्यक्त होणारे कलात्मक आविष्कार होय.'

**४) जोनास बलीस (Jonas Balys)**

'लोकसाहित्य ही आदिम मानवाबरोबर सुसंस्कृत मानवाचे ध्वनी आणि शब्दद्वारा गद्य व पद्य स्वरुपात झालेली परंपरागत निर्मिती होय. लोकविश्वास, लोकरूढी, लोकभ्रम, लोककलाप्रकार, नाट्य आदींचा समावेश लोकसाहित्यात होतो. 'Folklore comprizes traditional creation of people, primitive and civilized.'

**लोकसाहित्य म्हणजे काय? :**

आदरणीय दुर्गाबाई भागवत यांनी लोकसाहित्याचा अर्थ सरळ आणि सोप्या भाषेत सांगितला आहे. त्या म्हणतात की, 'लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास होय. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल यांचे निरीक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे लागेल. मानव व त्याच्या सभोवतालची चराचर सृष्टी हिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासानंतर विशेष लक्षात येते.' एकूण जगातील कोणत्याही भूप्रदेशातील मानवाच्या निर्मितीपासून आजपर्यंतच्या त्याच्या परंपरा, श्रद्धा-विश्वास, आचार-विचार आणि त्यांचे कलाविष्कार समजून घ्यावयाचे झाल्यास अभ्यासकाला त्याच्या लोकसाहित्याकडेच जावे लागते.

**मराठी लोकसाहित्याचा पाया :**

रॉयल एशियाटिक सोसायटीची स्थापना मुंबईमध्ये झाली. इंडियन अंटीक्वरी या मुखपत्रातून लोकसाहित्यअंतर्गत अनेक महत्वाचे संशोधनपर लेखन प्रसिद्ध होत होते. याबरोबरच 'बॉम्बे अथ्रोपोलोजीकल सोसायटी' ची स्थापना १८८६ साली झाली. या सोसायटीच्या नियतकालिकानेही लोकसाहित्यअभ्यासाला पोषक अशी प्रभावशाली कामगिरी बजावली आहे. भारतीय लोकजीवनाच्या विविध अंगांचा साहित्याच्या दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास करणे हा या संस्थेचा प्रमुख मूळ हेतू होता.

मराठी लोकसाहित्यावर इंग्रजी लेखन करणाऱ्यांमध्ये मेरी फ्रिअर यांचा प्रारंभीच उल्लेख करावा लागेल. भारतावरील ब्रिटीश सत्तेच्या कार्यकाळात मुंबईचे गव्हर्नर असलेले सर बार्टल फ्रिअर ह्यांची मेरी ही कन्या होय. तिच्या दाईचे काम पाहणारी अना लिबर्ट डिसुझाने मेरी ला काही रंजक मराठी लोककथा सांगितल्या आणि मेरीने

त्या ‘ओल्ड डेक्कन डेज’ ह्या नावाने प्रसिद्ध केल्या. इंग्रजीत आणलेल्या ह्या मराठी लोककथांना युरोपमध्ये त्या काळी फार मोठी लोकप्रियता मिळाली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर महाराष्ट्रात १९५६ साली ‘लोकसाहित्य समिती’ ची स्थापन झाली. या लोकसाहित्य समितीचे प्रथम अध्यक्ष म्हणून श्री. ची. ग. कर्वे यांची निवड झाली. या समितीचे कार्य फार महान आहे. समितीने महाराष्ट्रातील लोकसाहित्य संकलनाचे व्यापक प्रमाणात प्रयत्न केले. ही संकलने मोठ्या प्रमाणावर कथा आणि गीतांचीच संकलने आहेत. लोकसाहित्याच्या सैद्धांतिक अभ्यासाचे प्रयत्न या समितीकडून करण्यात आले. लोकसाहित्य संकलनाची २५ पेक्षा अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण पुस्तके समितीद्वारा प्रकाशित करून लोकसाहित्याच्या अभ्यासकांसाठी भरपूर सामग्रीचे संकलन करून ठेवले आहे. सन १९७९-८० मध्ये अनेक अभ्यासकांनी डॉ. प्रभाकर मांडे यांच्या पुढाकाराने एकत्र येऊन ‘लोकसाहित्य संशोधन मंडळ’ या महत्वपूर्ण संस्थेचा श्रीगणेशा केला. आधीपासूनच लोकसाहित्यामध्ये चिकित्सक अभ्यास व संशोधन करणारे डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. रा. चिं. ढेरे, दुर्गा भागवत, प्रा. नरहर कुरुंदकर यांसह अनेक विचारवंतानी या मंडळाची मुहूर्तमेढ रोवली आणि तेव्हापासून दरवर्षी लोकसाहित्य संशोधन मंडळ महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी अभ्यासकांची एक महत्त्वपूर्ण परिषद घेते. औपचारिक/अनौपचारिक पद्धतीने अभ्यास करणारे लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक, विचारवंत एकत्र येऊन महत्वपूर्ण, दर्जेदार विषयांवर चर्चासत्र आणि शोधनिबंध सदर करतात.

**लोकसमूहाला साक्षर करण्याचे प्रभावी माध्यम :**

प्रभावशाली लोकसाहित्याद्वारे अनेक महत्वाच्या बाबींचे ज्ञान प्राप्त होत असते. खऱ्या अर्थाने लोकसमूहाला सर्वार्थाने शिक्षित करण्याचे महत्वपूर्ण काम लोकसाहित्याद्वारे प्रभावीरित्या केले जाते. लोकसाहीत्याद्वारे लोकसमुहाच्या नीतिकल्पना, सामाजिक संकेत, समाजमान्य कृती आणि धार्मिक मुल्यसंस्कार, सामाजिक समस्या इत्यादी विषयींचे ज्ञान लोकसमूहाला प्राप्त होत असते. त्यामुळे लोकसाहित्य, लोकांना शिक्षण देण्याचे, बोध देण्याचे, समाजातील अनिष्ट रूढी परंपरा नष्ट करून चांगल्या सामाजिक बाबींची कास धरून समाजविकासासाठी आणि पर्यायाने लोकसमूहाला साक्षर करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे लोकसाहित्य होय.

**लोकसाहित्याला लोकजीवनाचा आधार :**

लोकासाहित्यातून खऱ्या अर्थाने लोकजीवन प्रांजळपणे व्यक्त होत असल्यामुळे लोकसमुहातील प्रत्येक व्यक्तीला आपण समस्त समूहाशी घट्टपणाने विणले गेलो आहोत याचे मनस्वी समाधान मिळते. म्हणूनच प्रामुख्याने लोकसाहित्याला लोकजीवनाचा सर्वस्वी आधार मानले गेले आहे. लोकसाहित्यीक डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते ‘ लोकसाहित्याच्या प्रेरणेनुसार समाजजीवन घडत असते आणि समाजजीवनाला आकार देण्याचे कार्यही लोकसाहित्याकडून घडत असते अशा परिस्थितीत लोकसाहित्याला लोकाजीवानापासून वेगळे काढण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्याचे लोकसाहित्य नष्ट करणे होय.’ थोडक्यात लोकजीवनाच्या प्रवाहाबरोबरच लोकसाहित्य वाहत असते. सोबतच चिरकाल जिवंत राहत असते. जीवन संदर्भ नष्ट झाला की, लोकसाहित्यातील ‘लोक’ तत्व नष्ट होऊन ते शिष्ट साहित्यात समाविष्ट होते. म्हणूनच लोकसाहित्याला लोकजीवनाचा सर्वस्वी आधार मानले गेले आहे.

**संदर्भ**


- लोकसाहित्याचे स्वरूप – डॉ. प्रभाकर मांडे.
- लोकसाहित्य शोध आणि समीक्षा – श्री. रा. चिं. ढेरे.
- लोकसाहित्य : क्षेत्रीय अभ्यास – डॉ. गंगाधर मोरजे.
- लोकसाहित्याची रूपरेखा – दुर्गा भागवत.
- इंटरनेट.